क्रमांक :- जमीन -२६०१/१७१ /प्र.क्र.६८५/ज-३
महसुल व वन विभाग,
मंत्रालय,मुंबई -४०० ०३२.
दिनांक :- २२ जुलै २००३

विषय :- जमीन - मुंबई उपनगर जिल्हा
मौजे एरंगळ , ता.बोरिवली , नभूक्र.२१९४ येथील जमीन
विद्युत उपकेंद्र उभारण्यासाठी मुंबई उपनगर विद्युत पुरवठा
कंपनीस देण्याबाबत.

ज्ञापन :

जिल्हाधिकारी , मुंबई उपनगर जिल्हा यांना वरील विषयांसंबंधीच्या त्यांच्या क्रमांक सी / कार्या-३ डी / वशि -२३८ /२००१, दिनांक १२/७ /२००१ च्या पत्रासंदर्भात विज्ञप्तिपूर्वक असे कळविण्यात येते की, मुंबई उपनगर विद्युत पुरवठा कंपनी यांना मौजे एरंगळ, पास्कल वाडी येथील रहिवाशांना विद्युत पुरवठा करण्याकरिता विद्युत उपकेंद्र उभारण्यासाठी मौजे एरंगळ , ता.बोरिवली नभूक्र.२१९४ पै मधील ४०० चौ. फुट जमीन महाराष्ट्र जमीन महसुल ( सरकारी जमिनींचे वितरण) नियम १९७१ मधील नियम ३५ च्या तरतुदीनुसार सदर जमिनीची आजच्या बाजारभावाची तात्पुरती किंमत प्रती चौ.फुटास रुपये ६६५ /- इतकी मानून या दराप्रमाणे मंजूर जमीनीच्या होणाऱ्या संपूर्ण बाजारभावाच्या किंमतीवर भारतीय स्टेट बँकेच्या त्या त्या वर्षाच्या १ जानेवारी रोजी अस्तित्वात असलेल्या " प्राईम लेंडिंग रेट " प्रमाणे भाडे आकारुन १० वर्षाच्या भाडेपट्टयाने नेहमीच्या अटी / शर्तीवर तसेच खालील अतिरिक्त अटीवर मंजूर करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

अट :- जिल्हाधिकारी यांनी मंजूर जमीनीची आजच्या बाजारभावाची किंमत सहाय्यक संचालक नगर रचना यांजकडून निर्धारित करुन घ्यावी. तात्पुरत्या किंमतीपेक्षा अंतिम किंमत अधिक असल्यास फरकाची रक्कम प्रचलित दराने व्याजासह वसूल करावी.

३. प्रस्तुत ज्ञापन नगर विकास विभागाच्या सहमतीने आणि वित्त विभागाने त्यांच्या क्रमांक - विअप्र १०९२ / प्र.क्र.१४८/९९/विनियम, दिनांक १.८.१९९२ अन्वये या विभागास प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(शिवाजी पाटणकर )
कार्यासन अधिकारी
महसुल व वन विभाग.

प्रति,
जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा,
प्रशासकीय इमारत , १० वा मजला,
वांद्रे, ( पुर्व ) मुंबई- ४०० ०५१.

प्रत :-
आयुक्त कोंकण विभाग भवन, नवी मुंबई,
जमाबंदी आयुक्त व संचालक भुमि अभिलेख , महाराष्ट्र राज्य, पुणे,
उपसंचालक, भूमि अभिलेख , कोंकण प्रदेश , मुंबई,
महालेखापाल , महाराष्ट्र राज्य ( लेखा अनुज्ञेयता ) मुंबई,
महालेखापाल , महाराष्ट्र राज्य, ( लेखा परीक्षा ), मुंबई,
अधिक्षक भूमि अभिलेख , मुंबई उपनगर जिल्हा, मुंबई,
सहाय्यक संचालक, नगर रचना व मुल्यनिर्धारण मुंबई उपनगर जिल्हा
नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
ज-३ कार्यासन , महसुल व वन विभाग , निवड नस्ती.

29 JUL 200
1659

C:\RDER % J-3.lwp C:\WINDOWS\Desktop\Rokade\LETTER 337

Scanned by CamScanner

# जिल्हाधिकारी मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, सरकारी वसाहत, बांद्रा (पू) मुंबई-५१

क्र. कार्या- ३ डी/ एल-६२३ /२००३
दिनांक : ~~२०/२००३~~ 21 NOV 2003

<u>वाचले:-</u> १) महसूल व वनविभाग, शासन आपन क्र. जमीन-२६०१/१७१/ प्र. क्र. ६८५/ज-३
दि. २२/७/२००३.

<u>आदेश :-</u>

मुंबई उपनगर विद्युत पुरवठा कंपनी यांना मौजे - एरंगळ, पास्कल वाडी येथील रहिवाशांना विद्युत पुरवठा करण्याकरीता विद्युत उपकेंद्र उभारण्यासाठी मौजे- एरंगळ, ता. बोरीवली, नगर भूमापन क्र. २११४ पै. मधील ४०० चौ. फूट जमिन महाराष्ट्र जमीन महसूल ( सरकारी जमिनींचे वितरण ) नियम, १९७१ मधील नियम ३५ च्या तरतुदीनुसार सदर जमिनीची आजच्या बाजारभावाची तात्पुरती किमत प्रति चौरस फूटास रु. ६६५/- इतकी मानून या दराप्रमाणे मंजूर जमिनीच्या होणा-या संपूर्ण बाजार भावाच्या किमतीवर भारतीय स्टेट बँकेच्या त्या त्या वर्षाच्या १ जानेवारी रोजी अस्तित्वात असलेल्या ' प्राईम लेंडींग रेट' प्रमाणे भाडे आकारुन १० वर्षाच्या भाडेपटटयाने अटी / शर्तीवर मंजूर करण्यात येत आहे.

मंजूर जमिनीची आजच्या बाजार भावाची तात्पुरती किमत प्रति चौरस फूटास रुपये ६६५/- इतकी मानून या दराप्रमाणे जमिनीची बाजार भावाची किमत रुपये २,६८,६७८/- इतकी होत असून त्यावर १ जानेवारी २००३ रोजीच्या १०.७५ % इतक्या प्राईम लेंडींग रेटप्रमाणे भाडेपटटयाची रक्कम रुपये २८,८८२/- इतकी होत आहे. कंपनीने सदरची रक्कम हा आदेश प्राप्त झालेपासून १० दिवसांत तहसिलदार बोरीवली यांचे कार्यालयात जमा करावी.

पुढील कालावधीसाठी भाडेपटयाची गणना तहसिलदार बोरीवली यांनी करणेची असून, जमिनीचे बाजारभावाची संपूर्ण किमत रु. २,६८,६७८/- इतक्या रक्कमेवर त्या त्या वर्षाच्या दिनांक १ जानेवारी रोजी असणा-या ' प्राईम लेंडींग रेट 'प्रमाणे त्या त्या वर्षाच्या भाडेपटटयाचे आकारणी नुसार कंपनीने भाडेपटयाची रक्कम आदा करणेची आहे.



Scanned by CamScanner

अटी/ शर्ती :-

१. कंपनीस, मंजूर जमिनीची आजच्या बाजार भावाची किंमत सहाय्यक संचालक, नगर रचना व मुल्य निर्धारण विभाग यांचेकडून निर्धारीत करुन घेतल्यानंतर तात्पुरत्या किमतीपेक्षा अंतिम किंमत अधिक असल्यास फरकाची रक्कम प्रचलित दराने व्याजासह भरणा करावी लागेल.

२. भाडेपट्टयाचे आकारणीत चूक झाल्याचे अथवा भाडेपट्टयाची वसूली कमी झाल्याचे निदर्शनास आल्यास त्याप्रमाणे भाडेपटयाची सुधारित आकारणी करणेत येईल व त्याप्रमाणे भाडेपट्टयाची रक्कम भरणे पट्टेदारास बंधनकारक राहील.

३. कंपनीस मंजूर जमिनीचा वापर मंजूर प्रयोजनार्थच करावा लागेल. तसा वापर करावयाचा नसल्यास कोणत्याही नुकसान भरपाई न मागता जमीन शासनाकडे परत करावी लागेल.

४. कंपनी, शासनाचे प्रचलित धोरणानुसार फक्त गणना झालेल्या [redacted] झोपडी धारकांनाच तथा ओळखपत्र धारक यांनाच विद्युत जोडणी देईल.

५. कंपनीस , किंवा तिचे व्यवस्थापक व मान्य अभिहस्तांकिती यांना मंजूर जमीन किंवा तिच्यातील कोणताही भाग किंवा हितसंबंध हस्तांतरीत करता येणार नाहीत.

६. कंपनीस, मंजूर जमीन विक्री, हस्तांतरण, पोटभाडेपट्टा, गहाण, तारण ठेवणे इत्यादी जिल्हाधिकारी यांचे पूर्व परवानगी शिवाय करता येणार नाही तसे केल्यास अर्नाजित उत्पन्नापैकी ९० % पर्यंतची रक्कम शासन / जिल्हाधिकारी यांना मिळण्याचा हक्क असेल.

७. कंपनी प्रत्येक वर्षाचे भोपट्टयाची रक्कम वर्षाच्या सुरुवातीलाच आदा करील.

८. भाडेपट्टयाची मुदत संपण्यापूर्वी ३ महिने अगोदर पट्टेदाराने त्याची इच्छा असल्यास, नवीकरण करण्याबाबतचा लेखी अर्ज जिल्हाधिका-यांकडे केला पाहिजे. पट्टेदाराने नवीकरणाबाबतत लेखी अर्ज न केल्यास भाडेपटयाची मुदत संपल्यानंतर त्यास नवीकरणाची आवश्यकता नाही असे मानून भाडेपट्टा संपुष्टात आणला जाईल.

९. कंपनीस शासनाबरोबर करारनामा करावा लागेल व त्यासाठीचा खर्च शासनाकडे जमा करावा लागेल.

१०. वरीलपैकी कोणत्याही अटी/ शर्तीचा भंग झाल्यास नुकसान भरपाई न देता जमीन शासन जमा करणेत येईल.

Scanned by CamScanner

११. कंपनीस , वरील अटी/ शर्ती मान्य असल्याचे रु. २५० चे मुद्रांकित पेपरवर हमीपत्र सादर करावे लागेल. हमीपत्र सादर केलेनंतर नगर भूमापन अधिकारी यांना जमिनीचा ताबा देणे बाबत कळविणेत येईल.

सही/-
जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हा करिता

स्वाक्षरीवर जिल्हाधिकारी
यांची सही आहे

प्रति,
मे. मुंबई उपनगर विद्युत पुरवठा कंपनी लि.
बी. एस्. ई. एस्. हाऊस,
सांताक्रुझ ( पूर्व ),
मुंबई ४०००५५.

प्रत. १) तहसिलदार बोरीवली/ नगर भूमापन अधिकारी, यांचेकडे माहीती व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

२/- त्यांनी गांवचे भूमि अभिलेखात योग्य त्या नोंदी घेऊन भूमि अभिलेखाच्या प्रतिसह अहवाल या कार्यालयास सादर करावा.

२) उपविभागीय अधिकारी , मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडे माहितीसाठी रवाना.

३) अधिक्षक,भूमि अभिलेख, मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडे माहीतीसाठी रवाना.

४) मा. प्रधान सचिव ( महसूल ), महसूल व वनविभाग, मंत्रालय मुंबई ४०००३२ यांजकडेस माहीतीसाठी सविनय सादर.

सही/-
जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा करिता

स्वाक्षरीवर जिल्हाधिकारी
यांची सही आहे

JSS
21/11/02